

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

(स्वायत्त) कोल्हापूर

## इतिहास विभाग

## सूचना - ICT द्वारे अध्यापन

११/११/२०२५

इतिहास विभागातील एम.ए. भाग I च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, गुरुवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी इतिहास विभागामार्फत "सुलतानशाहीचा इतिहास" या विषयांतर्गत "सुलतानशाही काळातील स्थापत्य शैली" या घटकाचा ICT (माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान) च्या माध्यमातून अभ्यास करण्यात येणार आहे. सदर सत्रामध्ये सुलतानशाही कालखंडातील विविध स्थापत्य वैशिष्ट्ये, वास्तुरचना, घुमट, कमानी, मशिदी व इतर वास्तूंची रचना यांचा दृश्य माध्यमांद्वारे अभ्यास केला जाणार आहे.

तरी सर्व विद्यार्थ्यांनी दुपारी १२.१५ वाजता रूम क्रमांक २१४ मध्ये वेळेवर उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांनी विषयाची पूर्वतयारी करून येणे अपेक्षित आहे.

डॉ. एस.आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर,
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

(स्वायत्त) कोल्हापूर

## इतिहास विभाग

### अहवाल : ICT द्वारे अध्यापन सत्र

१५/११/२०२५

इतिहास विभागामार्फत एम.ए. भाग I विद्यार्थ्यांसाठी "सुलतानशाहीचा इतिहास" या विषयांतर्गत "सुलतानशाही काळातील स्थापत्य शैली" या घटकावर आधारित ICT द्वारे अध्यापन सत्र गुरुवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी रूम क्रमांक २१४ येथे आयोजित करण्यात आले. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना सुलतानशाही कालखंडातील स्थापत्य शैलीची वैशिष्ट्ये दृश्य माध्यमांच्या साहाय्याने समजावून सांगण्यात आली. घुमट, कमानी, मिनार, मशिदींची रचना तसेच वास्तुशिल्पातील सौंदर्य व तांत्रिक वैशिष्ट्ये यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सत्राचे विशेष आकर्षण म्हणजे कुतुबमिनार या ऐतिहासिक वास्तूचा ३६० अंशांतील आभासी भ्रमण (360 Virtual Tour) विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना कुतुब मिनारची रचना, उंची, कोरीव काम तसेच त्याची स्थापत्य वैशिष्ट्ये प्रत्यक्ष पाहिल्याचा अनुभव मिळाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक अध्यापनाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने इतिहास अधिक प्रभावी व अनुभवाधारित पद्धतीने समजून घेता आला.

डॉ. एस.आर. कट्टीमनी

विभाग प्रमुख
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

## Use of ICT – १३ नोव्हेंबर, २०२५

## “सुलतानशाही काळातील स्थापत्य शैली”







